# अर्थशास्त्र
## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर VI)

- डॉ. प्रज्ञा बागडे

# सार्वजनिक उत्पनाचे स्त्रोत
## (Sources of Public Revenue)

सरकारी अर्थकारणाच्या दोन महत्वाच्या बाजू आहेत. १) सार्वजनिक आय २) सार्वजनिक व्यय. या दोन्ही बाजू अत्यंत महत्वाच्या बाजू आहेत. आज सरकारच्या कार्यक्षेत्रात सतत वाढ होत आहे. त्यामुळे खर्चातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या वाढत्या खर्चाला भागविण्यासाठी सरकारला आपल्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढवावे लागतात. यासाठी सरकारला आपल्या खर्चाचे नियोजन करीत असतांना उत्पन्नाच्या स्त्रोतांचेही नियोजन करावे लागते. थोडक्यात एखाद्या सामान्य व्यक्तीप्रमाणे सरकारला देखील आपला खर्च भागविण्यासाठी विविध मार्गांनी उत्पन्न गोळा करावे लागते.

## सार्वजनिक आय : अर्थ
### (Meaning of Public Revenue)

सरकारला सर्व स्त्रोतांपासून मिळणारे एकूण उत्पन्न म्हणजे सार्वजनिक उत्पन्न होय. डॉ. डाल्टन यांनी सार्वजनिक उत्पन्नाचे संकुचित व व्यापक दृष्टीकोनातून अर्थ सांगितले आहे. स्थूल अर्थाने सरकारची सर्व मिळकत म्हणजे सार्वजनिक उत्पन्न. व्यापक अर्थाने कर, शुल्क इत्यादी या सोबतच सरकारी कर्ज, सरकारी आदेयांच्या विक्रीपासून मिळणारी प्राप्ती इत्यादी स्त्रोतांचा समावेश करावा लागते. याउलट संकुचित अर्थाने ज्यांना उत्पन्न ही संज्ञा

लावता येते अशाच मिळकतीचा समावेश सार्वजनिक उत्पन्नात केला जातो. कर, शुल्क, मूल्य, देणग्या, दंड इत्यादींचा समावेश सार्वजनिक उत्पन्नात केला जातो.

## सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत

**(Sources of Public Revenue)**

### १) कर

**(Tax)**

सरकारला उपलब्ध असलेला अत्यंत महत्वाचा स्त्रोत म्हणजे कर. कर केवळ सरकारच लावू शकते. कर म्हणजे सरकारच्या हातात असलेले प्रभावी साधन ज्या साधनाचा उपयोग करुन सरकार आपली आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट्ये पूर्ण करते.

बॅस्टॅलच्या मते, “कर म्हणजे व्यक्तीने वा संस्थेने स्वत:च्या संपत्तीचा सार्वजनिक सत्तेच्या सेवेसाठी दिलेला सक्तीचा भाग होय.”

सेलिग्मनने कर हा व्यक्तीकडून सक्तीने घेतला जातो व तो सर्वांच्या हितासाठी खर्च केला जातो आणि वैयक्तिक लाभासाठी त्याचा काही संबंध नाही असे मत व्यक्त केले आहे.

डॉ. डाल्टन यांनी कराची व्याख्या करतांना कर हक सक्तीचे देणे आहे व त्याचा सममूल्य सेवेशी काही संबंध नाही असे म्हटले आहे. शिवाय कर म्हणजे कोणत्याही गुन्ह्याबद्दल लावलेला दंड नाही असेही त्यांनी म्हटले.

डॉ. डाल्टन व सेलिग्मन यांनी दिलेल्या व्याख्या ह्या आधुनिक काळातील प्रतिनिधिक व्याख्या म्हणून समजल्या जातात.

## करांची लक्षणे

१) कर हे सक्तीचे देणे आहे.

२) करांचे उत्पन्न सर्वांसाठी खर्च केले जाते.

३) करदाता व सरकार या दोघांमध्ये असलेला कोणत्याही प्रकारचा कराराचा अभाव

४) कर म्हणजे केवळ उत्पन्नाचे साधन नव्हे.

५) कर व्यक्ती अथवा व्यक्ती समूहाला भरावा लागतो.

६) कर आकारणीचा अधिकार फक्त शासनालाच असतो.

७) काही वेळेस कर भाराचे संक्रमण शक्य होते.

८) करवसूलीला कायद्याने अधिष्ठान असते.

करारोपण हे देशाचे अर्थकारण योग्य प्रकारे राबविण्यासाठी सरकारच्या अखत्यारिमधील एक प्रभावी शस्त्र होय. तसेच कर हे एक दुधारी शस्त्र आहे हे विसरता कामा नये. कर धोरणाचा अवलंब अविवेकाने केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. करारोपण हे काही उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच केले पाहिजे. कर साधनांचा उपयोग उत्पन्न मिळविण्याऐवजी अर्थव्यवस्थेला नियंत्रित व नियमित करण्याकडे व्हावा असे मत काही राजस्ववेते मांडतात.

करांच्या सहाय्याने देशातील संपत्तीच्या उत्पादनाला उत्तेजन देणे, देशातील संपत्तीचे योग्य व न्याय वितरण करणे व देशातील उपभोगाला योग्य दिशा उपलब्ध करुन देणे ही उद्दिष्ट्ये समोर ठेवली जातात. केन्स संप्रदायातील अर्थतज्ञ म्हणतात करांचा उपयोग वर उल्लेखिलेली उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी करायला हवा, उत्पन्न मिळविण्यासाठीच नव्हे.

कर हे सरकारजवळील एक हुकमी साधन आहे. ज्याचा उपयोग करुन सरकार पुरेसा पैसा उभारु शकते. परंतु उत्पन्न आणि नियंत्रण या दोन्ही उद्दिष्टांचा योग्य समन्वय साधता आला पाहिजे.

## २) मूल्य

सरकार काही वस्तूंची निर्मिती करते व त्यांची विक्रीही करते. या वस्तू व सेवाची विक्री करण्यासाठी त्याचे मूल्यही ठरवावे लाबते. या विक्रीतून सरकारला बरेच उत्पन्न मिळते. हे उत्पन्न वाणिज्य स्वरुपाचेच आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. या मूल्यामध्ये रेल्वेचे व बसचे भाडे, डाक तार दर, विजेचे दर, सरकारी दुधाचे मूल्य इत्यादी मूल्यांचा समावेश होतो.

मूल्य व कर यांची तुलना केल्यास असे दिसून येते की, कर हे सक्तीचे देणे आहे व ज्याच्यावर ते लावले जातात त्याला ते द्यावेच लागतात. मूल्यात अशी सक्ती अभिप्रेत नाही. ज्या व्यक्तीने सरकारने निर्माण केलेल्या वस्तू व सेवा विकत घेतल्या असतील तरच त्या व्यक्तीला त्यांचे मूल्य द्यावे लागते.

प्रो. टेलर यांनी मूल्यासंबंधी असे मत व्यक्त केले की, मूल्य हा वाणिज्य स्त्रोत आहे व तो इतर स्त्रोतांपासून वेगळा आहे. त्याचे वेगळेपण वस्तू व सेवांच्या प्राप्तीत आहे. मूल्य दिल्याबरोबर वस्तू व सेवांची प्राप्ती होते. दिलेले मूल्य, वस्तू व सेवांचा लाभ याची उपभोक्ता तुलना करतो ही त्याची प्रकृती आहे.

## ३) शुल्क

**(Fees)**

सरकारच्या उत्पन्नाचा शुल्क हा एक महत्वाचा स्त्रोत आहे. सरकार ज्या विविध प्रशासकीय व इतर सेवा जनेतला प्रदान करते त्या सेवांचा खर्च अंशत: भरुन निघण्यासाठी

शुल्क आकारले जाते. शुल्क हे ऐच्छिक देणे आहे. ज्याला एखादी विशिष्ट प्रकारची सेवा प्राप्त करायची असेल त्याने शुल्क देऊन ती प्राप्त करावी असा व्यवहार असतो. उदा. शिक्षण शुल्क, चिकित्सा शुल्क, नोंदणी शुल्क, परवाना शुल्क इत्यादी. त्याचप्रमाणे लग्नाची नोंदणी ही अनिवार्य केली आहे. त्यामुळे त्यासाठी द्यावे लागणारे शुल्क अनिवार्य झाले आहे.

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, शुल्काची तुलना मूल्याशी किंवा किंमतीशी करणे अधिक सांयुक्तिक ठरते. शुल्क व मूल्य दोन्हीही ऐच्छिक असतात. कराप्रमाणे त्यात सक्ती नसते. कर हे सामाजिक हितासाठी वापरले जातात. याउलट शुल्क सामाजिक अथवा प्रशासकीय सेवेसाठी आकारले जातात.

**४) विशेष निर्धारण**

सरकारला जेव्हा समाजासाठी काही सुधारणा करावयाच्या असतात व समाजाच्या भौतिक संपत्तीत भर टाकायची असते. तेव्हा सरकार अशा सुधारणांचा ज्या व्यक्तींना फायदा होणार असेल अशा व्यक्तींना सुधारणा करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा काही भाग द्यावयास लावते. उदा. रस्ते, रेल्वे मार्ग, सांडपाण्याची सोय इत्यादी. या सोयींचा लाभ सर्व समाजाला होतोच परंतु त्या भागातील संपत्तीधारकांना विशेष लाभ मिळतो. कारण सार्वजनिक सत्तेने केलेल्या सुधारणेमुळे व्यक्तीच्या संपत्तीची किंमत वाढत जाते. विशेष निर्धारणाचा उद्देश सर्वसामान्यांच्या हितासाठी समाजाच्या भौतिक संपत्तीची वाढ करणे हा असतो.

विशेष निर्धारण आकारतांना व्यक्तीच्या संपत्तीत सार्वजनिक सत्तेने केलेल्या सुधारणांमुळे किती वाढ झाली हे लक्षात घेतले जाते. व्यक्तीच्या संपत्तीच्या मूल्यातील वाढ हाच विशेष निर्धारणाचा आधार असतो.

## ५) दंड

**(Fine)**

सार्वजनिक सत्तांच्या नियमांचे पालन न करणाऱ्यांना पैशाच्या स्वरुपात शिक्षा म्हणून जी रक्कम द्यावी लागते तिला दंड म्हणतात. दंड हे सरकारच्या उत्पन्नाचे साधन होवू शकत नाही. प्रशासनाच्या खर्चाशी दंडाचा काहीच संबंध नसतो. अपराध्याच्या तीव्रतेशी दंडाचा संबंध असतो. दंडामुळे शासकीय नियम मोडण्याच्या प्रवृत्तीला आळा बसतो. दंड आकारण्यामागचा उद्देश्य असा असतो की, शासकीय नियम मोडणाऱ्यास जरब बसावी व इतर व्यक्तींनीही तसा अपराध करु नये. सामान्यत: अपराधाच्या स्वरुपावरुन दंड आकारण्यात येतो. मोठ्या अपराधासाठी जास्त दंड व लहान अपराधासाठी कमी दंड आकारण्यात येतो.

## ६) अनुदाने

**(Grants)**

अनुदाने हे सरकारी उत्पन्नाचे साधन होय. एका स्तरावरील सरकार दुसऱ्या स्तरावरील सरकारला अनुदान देत असते. भारतात केंद्र सरकार राज्य सरकारांना अनुदान देते व राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने देत असते. ही अनुदाने सामान्य किंवा विशेष प्रकारची असतात. विशेष अनुदाने विशिष्ट कार्याकरिताच दिली जातात. उदा. रस्ते बांधणी, सांडपाणी योजना, शैक्षणिक व आरोग्य योजना, महागाई भत्ता इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अनुदाने दिली जातात.

एखादा देश दुसऱ्या देशांना जी अनुदाने देतात ती 'मदत' या सदरात मोडते. उदा. मदत म्हणजे शस्त्रात्रांची मदत, आर्थिक मदत तांत्रिक मदत इत्यादी. विकसित देश अविकसित देशांना अशा प्रकारची मदत देत असते. या मदतीमुळे अविकसित देशाचा विकास होण्यास मदत होते. परंतु अशा प्रकारची मदत ही अनिश्चित व सशर्त असते.

## ७) देणग्या

**(Donations/Gifts)**

स्रकारला लोकोपयोगी, सामाजिक कार्यामध्ये लोकांनी भाग घ्यावा असे वाटते. लोकांना ही कार्ये आपली वाटावी म्हणून या कार्याच्या खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून सरकार व्यक्ती व खाजगी संस्थाकडून देणग्या स्विकारते. रुग्णालये, वाचनालये, शाळा, महाविद्यालये इत्यादींच्या संचालनासाठी सरकार देणग्या स्विकारते. या व्यतिरिक्त काही विशेष प्रसंगी सरकार लोकांकडून देणग्या स्विकारते. उदा. दुष्काळ, रोगराई, युद्ध, भूकंप, पूर अशा आपत्ती ओढावल्यास सरकार लोकांनी सढळ हातांनी देणग्या द्याव्यात अशी अपेक्षा करते.

या देणग्यांमुळे सरकारी खर्चाचा भार हलका होतो असे नाही परंतू राष्ट्राच्या कार्यात आपलाही काही हिस्सा आहे ही आपलेपणाची भावना निर्माण करण्याचा उद्देश असतो.

# अपेक्षित प्रश्न

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) सरकारच्या उत्पन्नाचे विविध स्त्रोत कोणते.?

**लघुत्तरी प्रश्न**

१) सार्वजनिक आय म्हणजे काय?

२) कर म्हणजे काय?

३) कराची लक्षणे सांगा.

४) मूल्य म्हणजे काय त्याचे स्पष्टीकरण करा.

५) शुल्क म्हणजे काय?

६) विशेष निर्धारण म्हणजे काय?

७) दंड म्हणजे काय?

८) अनुदाने म्हणजे काय? ते सविस्तर स्पष्ट करा.

९) 'देणग्या' (Donations) यावर टिपण लिहा.